**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद ठाणे**

कार्यालयाचा पत्ता : बी. जे. हायस्कूल इमारत, दुसरा मजला, टेंभी नाका (प) ४०० ६०१.

दुरध्वनी क्रमांक ०२२ - २५३६२४४५ **Email : ednprim1@gmail.com**

जा.क्र. ठाजिप/शिक्षण/प्राशि/आस्था ४/वशी - दिनांक : /०८/२०२४

**जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये प्राथमिक शिक्षकांची कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात भरती जाहिरात**

ठाणे जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पात्र उमेदवारांची उपशिक्षक / विषय शिक्षक या पदावर एकत्रित मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेसाठी समक्ष अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. सदर एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने शिक्षक नेमणूका या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षक भरती होईपर्यंत करणेत येत आहेत. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नेमणूकीचा हक्क प्राप्त राहणार नाही. आवश्यकतेनूसार ही मुदत दिलेल्या कालावधीपूर्वी केव्हाही संपुष्टात आणण्याचा हक्क मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचा राहील. त्यानंतर सदरचा कालावधी कोणतीही पूर्वसूचना न देता आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही. तसे हमीपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२. **शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता -**

| अध्यापनाचे विषय | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता |
|---|---|
| इ. १ ली ते ५ वी या वर्गांसाठीचे सर्व विषय | मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणातील (B.El.Ed.) परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (विशेष शिक्षण) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त मंडळाची किमान ४५% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची प्राथमिक शिक्षणशास्त्र दोन वर्षांची पदविका परीक्षा (D.T.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा किमान ५० % गुणांसह उत्तीर्ण आणि राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून बी. एड परीक्षा उत्तीर्ण<br>**किंवा**<br>TCH (महाराष्ट्र - कर्नाटक सीमावर्ती भागातील ८६५ गावांतील उमेदवार संदर्भात कर्नाटक राज्याची TCH परीक्षा उत्तीर्ण) |

| | |
|---|---|
| इ. ६ वी ते ८ वी या वर्गासाठीचे इंग्रजी, मराठी व हिंदी विषय | मान्यताप्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण आणि मान्याता प्राप्त संस्थेची दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) किंवा शिक्षणशास्त्र पदवी - बी.एड (विशेष शिक्षण) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची संबंधित विषयातील किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५० % गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.A.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |
| इ. ६ वी ते ८ वी या वर्गांसाठीचा गणित विषय | मान्यताप्राप्त गणित/संख्याशास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/कम्प्युटर विद्यापीठाची सायन्स/माहिती तंत्रज्ञान विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण आणि दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) किंवा शिक्षणशास्त्र पदवी बी.एड (विशेष शिक्षण ) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.Sc.Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |
| इ. ६ वी ते ८ वी या वर्गांसाठीचा विज्ञान विषय | मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र / रसायनशास्त्र/ वनस्पतीशास्त्र / प्राणीशास्त्र / जीव विज्ञान (Life Sciences)/ पर्यावरणशास्त्र/सूक्ष्मजीवशास्त्र (Microbiology) / जैवतंत्रज्ञान (Biotechnology)/जीवरसायनशास्त्र (Biochemistry) / कृषीशास्त्र विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबंधित विषयासह किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण आणि दोन वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदविका परीक्षा (त्यास कोणतेही नाव दिले असो) उत्तीर्ण किंवा शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड) किंवा शिक्षणशास्त्र पदवी बी.एड (विशेष शिक्षण) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण.<br>**किंवा**<br>राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या २००२ च्या तरतूदीनुसार मान्यता प्राप्त विद्यापीठाची किमान ४५% गुणांसह पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्यता प्राप्त संस्थेची शिक्षणशास्त्र विषयातील एक वर्षांची पदवी (B.Ed.) उत्तीर्ण (त्यास कोणतेही नाव असो.)<br>**किंवा**<br>मान्यताप्राप्त मंडळाची किमान ५०% गुणांसह उच्च माध्यमिक (किंवा समकक्ष) परीक्षा उत्तीर्ण आणि संबंधित विषयातील ४ वर्षांची प्राथमिक शिक्षणशास्त्र पदवी परीक्षा (B.El.Ed.) उत्तीर्ण किंवा ४ वर्षांची B.Sc. Ed. (किंवा समकक्ष) परीक्षा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद मान्यताप्राप्त संस्थेतून उत्तीर्ण. |
| शिक्षक पात्रता परीक्षा (TET) | इ. १ ली ते ५ वी व इ. ६ वी ते ८ वी या दोनही गटांसाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (NCTE) यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाकडील (CTET) व महाराष्ट्र शासन आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibity Test- TET) उत्तीर्ण अनिवार्य असेल. |

CamScanner

३. **वयोमर्यादा** - सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.
४. **मासिक मानधन** - रुपये २०,०००/- प्रतिमाह (इतर कोणतेही लाभाव्यतिरिक्त)
५. उमेदवारांना शालेय सुट्या वगळून इतर सुट्या राहणार नाहीत.
६. अर्जदार हा संबंधित नियुक्तीकरिता शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा (नियुक्तीवेळी शासकिय रुग्णालयाचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.)
७. जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी अर्जदारास करारनामा स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे.
८. **बंधपत्र / हमीपत्र** - नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, या आशयाचे बंधपत्र/ हमीपत्र देणे आवश्यक आहे. या बंधपत्र/हमीपत्रामध्ये करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तीकडुन नियमित सेवेत घेण्याबावत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यांत येणार नाही याचा उल्लेख करणे आवश्यक राहील.
९. पात्र उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे.
१०. अपुर्ण माहिती व अटीची पुर्तता न करणा-या उमेदवाराचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील, याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
११. नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारांना जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील ज्या शाळांमध्ये रिक्त पद आहे अशा कोणत्याही प्राथमिक शाळेवर कामकाज करावे लागेल. तसेच प्राथमिक शाळेवर आवश्यकतेनुसार गरज पडल्यास इतर विषयाच्या अध्यापनाचे कामकाज करावे लागेल.
१२. कंत्राटी तत्त्वावर शिक्षकांना नियुक्ती देण्यासाठी रिक्त पदांची संख्या निश्चित करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांना राहील.
१३. वरील संपूर्ण प्रक्रिया मा. आयुक्त (शिक्षण) यांच्या नियंत्रणाखाली पूर्ण करण्यात येईल. सदर प्रकिये संदर्भात आवश्यकता असल्यास मा. आयुक्त (शिक्षण) यांनी अतिरिक्त सूचना निर्गमित केल्यास त्या सूचना संबंधित नियुक्ती केलेल्या शिक्षकांवर लागू राहतील.
१४. उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यात कंत्राटी तत्त्वावर शिक्षक या पदासाठीचा अर्ज (परिशिष्ट -अ) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्या नावाने करावा. सदरचा अर्ज दि. १४/०८/२०२४ ते दि. २२/०८/२०२४ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत (सुटटीचे दिवस वगळून) ठाणे जिल्हयातील आपल्या लगतच्या / सोयीच्या **गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड व शहापूर** या कार्यालयात जमा करावेत व अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सादर कराव्यात. सायंकाळी ५.०० नंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
१५. पोस्टाने / कुरीयरने येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
१६. अर्जदार सेवानिवृत्त शिक्षकांनी विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. अर्जाच्या पाकिटावर **'प्राथमिक शिक्षक कंत्राटी पदांकरीता अर्ज'** असे नमुद करावे.
१७. सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद ठाणेच्या https://zpthane.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर पाहता येईल. जाहिरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचा राहील.

(रोहन घुगे भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

CamScanner

# परिशिष्ट - अ

## जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती सन - २०२४

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक ----------- व दिनांक -------------

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**

**जिल्हा परिषद ठाणे**

**विषय - जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये प्राथमिक शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती सन २०२४**

उमेदवाराचे पूर्ण नाव ----------------------------------------------------------------------------

पत्ता ----------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------- मोबाईल क्र. -----------------------------------

जात प्रवर्ग ---------------------------

निवडीचे पद -------------------------- पदवीधर असल्यास विषय ---------------------

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | होय / नाही |
|---|---|---|
| | **शैक्षणिक अर्हता** | |
| १. | एस. एस. सी. गुणपत्रक | |
| २. | एस. एस. सी. प्रमाणपत्र | |
| ३. | एच. एस. सी. गुणपत्रक | |
| ४. | एच. एस. सी. प्रमाणपत्र | |
| ५. | पदवी परीक्षा गुणपत्रक | |
| ६. | पदवी परीक्षा प्रमाणपत्र | |
| ७. | पदव्युत्तर परीक्षा गुणपत्रक | |
| ८. | पदव्युत्तर परीक्षा प्रमाणपत्र | |
| | **व्यावसायिक अर्हता** | |
| ९. | शिक्षणशास्त्र पदविका गुणपत्रक D.ed/D.L.Ed/D.T.Ed/T.C.H. | |
| १०. | शिक्षणशास्त्र पदविका प्रमाणपत्र D.ed/D.L.Ed/D.T.Ed/T.C.H. | |
| ११. | शिक्षणशास्त्र पदवी गुणपत्रक B.Ed/B.L.Ed/B.Sc.Ed | |
| १२. | शिक्षणशास्त्र पदवी प्रमाणपत्र B.Ed/B.L.Ed/B.Sc.Ed | |
| १३. | एम. एस. सी. आय. टी. प्रमाणपत्र | |
| १४. | शिक्षक पात्रता परीक्षा पेपर - १ (TET) प्रमाणपत्र (इ. १ ते ५ वी) | |
| १५. | केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा पेपर - १ (CTET) प्रमाणपत्र (इ. १ ते ५ वी) | |
| १६. | शिक्षक पात्रता परीक्षा पेपर - २ (TET) प्रमाणपत्र (इ. ६ वी ८ वी) (भाषा - कोणताही विषय उत्तीर्ण, गणित - गणित व विज्ञान पेपर उत्तीर्ण आवश्यक) | |
| १७. | केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा पेपर - १ (CTET) प्रमाणपत्र (इ. ६ वी ८ वी) (भाषा - कोणताही विषय उत्तीर्ण, गणित - गणित व विज्ञान पेपर उत्तीर्ण आवश्यक) | |

CamScanner

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | होय / नाही |
|---|---|---|
| | **इतर आवश्यक कागदपत्रे** | |
| १८. | जातीचे प्रमाणपत्र | |
| १९. | जात वैधता प्रमाणपत्र | |
| २०. | लहान कुटुंब प्रमाणपत्र | |
| २१. | शाळा सोडल्याचा दाखला | |
| २२. | जन्म प्रमाणपत्र (शालांत परीक्षा प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला) ३१/०८/२०२४ रोजीचे वय | |
| २३. | महाराष्ट्रातील रहिवाशी असलेला अधिवास दाखला (सीमा भागातील ८६५ गावातील असल्यास रहिवाशी दाखला) | |
| २४. | आधारकार्ड / पासपोर्ट / पॅनकार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स इ. | |
| २५. | TET गैरप्रकार मधील असल्यास चारित्र्य पडताळणी दाखला (असा दाखला नसल्यास नियुक्ती देण्यात येणार नाही) | |
| २६. | विवाहानंतर नावात बदल असल्यास राजपत्र | |
| २७. | हमीपत्र (सादर केलेले दस्ताऐवज वैध असलेबाबत) | |

## प्रतिज्ञापत्र

मी शपथपुर्वक प्रमाणित करतो / करते की,

१. सदर अर्जात व अर्जासोबत सादर केलेली माहिती खरी आहे.

२. माझा यापुर्वी कोणत्याही सिध्द अपराध गुन्हयात सहभाग नाही अथवा अशा गुन्हयाबाबत शिक्षा किंवा न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

३. मी जिल्हा परिषद ठाणे /पंचायत समिती/ग्रामपंचायत येथे सदस्य नसुन यापैकी कुठल्याही संस्थेसोबत माझे व्यावसायिक (पुरवठादार / कंत्राटदार) संबंध थेट किंवा भागीदारीत नाहीत.

४. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी नियुक्ती रद्द करण्यांत यावी. तसेच माझ्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यांत यावी. त्या माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

५. मला प्राथमिक शिक्षक म्हणून कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याची पूर्ण माहिती आहे. तसेच मला अशी नियुक्ती दिल्यास मी जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे बंधपत्र / हमीपत्र सादर करेल.

दिनांक :- अर्जदाराची सही ----------------------------

स्थळ :- अर्जदाराचे नाव ------------------------------------

CamScanner